**मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम,२०२१ ची अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह (परिवहन) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एमव्हीआर-०५२२/प्र.क्र.४१/भाग-१/परि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १४ नोव्हेंबर २०२४.

**वाचा :-** १) केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०२१ व दि.१३.०९.२०२२ रोजी मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.४४(१)/PF-S/२०२२-२३ (CAPEX), दि.१६.१२.२०२२.
३) केंद्र शासनाचे मा.सचिव (परिवहन) व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेले पत्र क्र.RT-२३०१३/८/२०२२-T, दिनांक १७.१२.२०२२.
४) समक्रमांक दिनांक २७.०१.२०२३ रोजीचा शासन निर्णय.
५) वित्त मंत्रालय, व्यय विभाग (सार्वजनिक उपक्रम - राज्य विभाग), भारत सरकार यांचे दिनांक ०९.०८.२०२४ रोजीचे पत्र.
६) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-११२४/सीआर-४६(बी)/का.२(३)/ जा.क्र.१२९२३, दिनांक १४.११.२०२४

**प्रस्तावना :-**

राज्यातील वाहनांचे प्रदूषण कमी करणे, रस्त्यावरील प्रवासी तसेच वाहनांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ करणे, वाहनांची इंधन कार्यक्षमता सुधारणे, वाहनांवरील देखभाल खर्च कमी करणे तसेच जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने वापरात आणणे व त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये गुणात्मक सुधारणा होण्यासाठी केंद्र शासनाने मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ प्रसिध्द केले असून तद्नुषंगाने धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे (Operational guidelines for setting up of Registered Vehicle Scrapping Facility) निर्ममित करण्यात आली आहेत. याबाबत राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात निष्कासित (Scrap) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ राज्यात राबविण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या दिनांक ०९.०८.२०२४ रोजीच्या पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून **सदर शासन निर्णयाच्या**

**दिनांकापर्यंत १५ वर्षे किंवा** १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करणे आवश्यक आहे. मोटार वाहन विभागाच्या संगणकीय अभिलेखानुसार (परिवहन पोर्टलवर) राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय, निम-शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील एकूण १३,००० इतकी वाहने १५ वर्षे पेक्षा जास्त वयाची आहेत. सदर वाहने संबंधित विभागांनी दिनांक ३१.०१.२०२५ पर्यंत रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने Registered Vehicle Scrapping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करण्यात यावीत.

२. जी शासकीय वाहने १५ वर्षापेक्षा जास्त वयाची आहेत व ज्यांचे निर्लेखन करण्यात आले नाही, परंतु ती आज अखेर वापरात आहेत अशी वाहने निष्कासित केल्यानंतर त्या वाहनांच्या बदल्यात संबंधित विभागास प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नवीन वाहने खरेदी / भाडे तत्वावर घेता येतील.

३. सदर अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही परिवहन आयुक्त कार्यालयाने तात्काळ करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१११४१७३५२४८१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAGAR DHONDIRAM PATIL

Digitally signed by SAGAR DHONDIRAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=b303a302c4285dac740589e585048fce69e2ef2ade0799db990bcdca3ead8311, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0255578456B2F5C05285C172A57976163858393ED219ED428FAD29A0BBE29DEE, cn=SAGAR DHONDIRAM PATIL
Date: 2024.11.14 17:36:02 +05'30'

**( सागर धों. पाटील )**
**कक्ष अधिकारी, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा .राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.
७) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) अपर परिवहन आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) परिवहन उपायुक्त (अंमल-२).
१०) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा(, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.

११) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
१४) वित्त विभाग (सेवा-५), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५) गृह विभाग (बीयुडी २/परिवहन ४) मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती.